# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## प्रायोरिटी सेक्शन एक ते दीड वर्षांत सुरु करण्याचा उद्दिष्ट," – महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांची माहिती



नागपूर: महामेट्रो नागपूर फेज-II वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असून, या प्रक्रियेचा भाग म्हणून प्राप्रायोरिटी सेक्शन मध्ये प्रवासी सेवा सुरु करण्याचे उद्दिष्ट येत्या एक ते दीड वर्षांत पूर्ण करण्याचे लक्ष आहे, अशी माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांनी दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी मेट्रो भवन, नागपूर येथे दिली.

श्री. हर्डीकर स्वातंत्र्याच्या ७९व्या वर्धापन दिनानिमित्त मेट्रो भवन येथे उपस्थित अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना संबोधित करत होते. त्यांनी ध्वजारोहण करून नागपूर, पुणे, ठाणे व नवी मुंबई येथील सर्व कर्मचार्यां ना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

ऑटोमोटिव्ह चौक ते लेखा नगर मेट्रो स्थानकांदरम्यानचा विभाग हा महामेट्रो नागपूरचा प्रायोरिटी सेक्शन असून, तो ६.९२ किलोमीटर लांब आहे. या मार्गामध्ये पिली नदी, खसरा फाटा, ऑल इंडिया रेडिओ, खैरी फाटा, लोक विहार आणि लेखा नगर ही मेट्रो स्थानके आहेत. यावेळी श्री. हार्डीकर म्हणाले की, "संपूर्ण प्रकल्प व सिस्टीम विभाग हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कार्यरत असून नागपूरकरांना सुरक्षित, शाश्वत व वेळेत सार्वजनिक परिवहन सेवा देण्याच्या दृष्टीने कटिबद्ध आहेत. महामेट्रोने नागरिकांना सुरक्षित आणि वेळेत सेवा देण्यात उच्च मानांकन गाठले आहे."

"महामेट्रोची सध्या दररोज सरासरी एक लाख प्रवासी वाहतूक करण्याचा टप्पा पार केला असून एकूण १० कोटी प्रवाशांची संख्या गाठण्यात आली आहे. या दुहेरी यशाबद्दल मी ऑपरेशन्स आणि मेंटेनन्स विभागासह सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो," असेही ते म्हणाले.

"नागपूर मेट्रोची प्रवासीसंख्या आणखी वाढवायची असेल, तर इतर परिवहन माध्यमांशी एकत्रिकरण, फर्स्ट व लास्ट माईल कनेक्टिव्हिटी आणि प्रवाशांना मेट्रो स्थानकांपर्यंत सहज पोहोचता येईल अशी सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. प्रवाशाला सिंगल जर्नी एक्सपीरियन्स मिळावा, यासाठी सिंगल टिकेटिंग सिस्टम ही गरज आहे," असे ते म्हणाले.

या सर्व गोष्टींसाठी उत्कृष्ट डिझाइन व नियोजन कौशल्याची आवश्यकता असून, इतर परिवहन सेवा बरोबर समन्वय साधून हे साध्य करता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. "सार्वजनिक परिवहनाचा वाटा वाढवला नाही, तर इंटिग्रेटेड सार्वजनिक सेवा निर्माण होणार नाही. ही बाब नागपूर मेट्रोच्या स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग व मल्टी-मोडल इंटिग्रेशन (MMI) टीमसाठी मोठे आव्हान असेल," असेही त्यांनी नमूद केले.

"अलीकडेच महामेट्रो नागपूरने कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन (CMP) बाबत मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी आणि मा. जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमोर सादरीकरण केले. हा कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन सर्वसामान्यांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांसाठी सार्वजनिक परिवहन सहज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवतो," असेही त्यांनी सांगितले.

"हीच खरी स्वातंत्र्याची भावना असून, फेअर बॉक्स आणि नॉन-फेअर बॉक्स रेव्हेन्यू ही नागपूर मेट्रोची महत्वाची तत्त्वे आहेत. महामेट्रो हा केवळ एक प्रकल्प नसून, मूल्यांना प्राधान्य देणारी संस्था आहे. नागपूर महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी या मूल्यांना कायम जपले आहे आणि हीच देशसेवा असून, ही सेवा आपल्याला पुढे घेऊन जाणारी आहे," असे श्री. हर्डीकर यांनी आपल्या भाषणाची सांगता करताना नमूद केले. यावेळी संचालक(स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री अनिल कोकाटे,संचालक(वित्त) श्री हरेंद्र पांडे आणि इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.